# चित्रपट-संगीताविषयी काही प्रश्न

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - रुची संगीत विशेषांक, संपा.वासंती मुझुमदार, दिनकर गांगल, ग्रंथाली अभिनव वाचक चळवळ, मुंबई, २५ डिसेंबर, १९८४)

***चित्रपट-संगीतात अनेक वेगवेगळ्या संगीतप्रकारांचा समावेश असलेला दिसतो. मग चित्रपटसंगीत म्हणजे नेमके काय म्हणता येईल?***

मला वाटतं चित्रपटसंगीतात अनेक संगीतप्रकारांचा समावेश असतो म्हणून चित्रपटसंगीताचा वेगळेपणा उठून दिसत नाही हे म्हणणं तितकंसं बरोबर नाही. तसं पाहिलं तर नाटकातही अनेक प्रकारच्या संगीताचा समावेश असतो. अनेक प्रकार असूनसुद्धा ते कुठल्या प्रयोजनासाठी वापरले जातात हे अधिक महत्त्वाचं असतं आणि म्हणून चित्रपटसंगीत वेगळं. चित्रपटात वापरलेलं, चित्रपटाला पुढे नेणारं संगीत म्हणजे चित्रपटसंगीत.

साहित्याच्या संदर्भात असं म्हटलं जातं की मुळात ते कोठून निघालं यावर त्याची प्रतवारी ठरवली जात नाही. त्याप्रमाणे मुळामधला ख्याल चित्रपटात आला म्हणून ख्यालाच्या सापेक्षतेनंच त्याचा विचार करायला हवा असं नाही. त्या चित्रपटाच्या एकंदर बांधणीमध्ये तो प्रकार काय करतो, हे महत्त्वाचं ठरतं. मुळामध्ये प्रकार कोणताही असला तरी त्याचा 'चित्रपटसंगीत आहे की नाही' या प्रश्नाशी फारसा संबंध पोचत नाही. चित्रपटामध्ये त्याचं कार्य काय आहे आणि ते साधलं जातंकी नाही यावरून ती गोष्ट चित्रपटसंगीत आहे की नाही हे ठरवावं लागेल.

आता, वेगवेगळे संगीतप्रकार म्हणजे मघाशी मी म्हटलं तसं-ख्याल आला की शास्त्रीय संगीत येतं. ("मी तुळस तुझ्या अंगणी"मध्ये पूर्णपणे 'ऑपरॅटिक' पद्धतीचीरचना आली आहे.) नाट्यसंगीत, लावण्या, अभंग, लोकसंगीत हे सगळे प्रकार त्यांच्या ताकदीनंचित्रपटाच्या बाहेर वावरतात त्या वेळी ते वेगवेगळे प्रकार असतात, परंतु हे वेगळे प्रकार असूनसुद्धा जेव्हा चित्रपटात येतात तेव्हा त्यांचं कार्य काहीतरी वेगळं होत असतं ही गोष्ट उघडच आहे. तेव्हा चित्रपटाच्या परिघाच्या बाहेर असलेले संगीतप्रकार कुठलेही असले तरी त्याचा आपल्या विचारावर परिणाम होण्याचं काहीच कारण नाही. चित्रपटामध्ये त्यांचं काही कार्यघडतं की नाही हे पाहावं लागतं.

आपल्या एकंदर कलासोपनाच्या परंपरेत चित्रपटांचं नेमकं स्थान काय आहे, इथपासून प्रश्न सुरू होतात. मला असं वाटतं, नाटकाला जसं आपण एक 'कॉम्पोझिट आर्ट फॉर्म' समजतो तसंच चित्रपट हाही एक 'कॉम्पोझिट आर्ट फॉर्म' आहे, असं म्हणता येईल आणि त्यामुळे त्याच्यामध्ये वेगवेगळ्या गोष्टी येणं हे त्याचं अंगभूत लक्षणच ठरतं. हे आपण गृहीत धरलं पाहिजे. असं जर होत नसेल तर मग काहीतरी गडबड आहे असं म्हणावं लागेल.

***चांगल्या आणि योग्य चित्रपटसंगीताची तुमची कल्पना काय आहे?***

मला वाटतं हा प्रश्न तसा योग्य नाही. कारण 'अमुक अमुक म्हणजे चित्रपटसंगीत' असं बरोबर नाही. 'अमुक म्हणजे चित्रपट' अशी व्याख्या देता येते काय? चित्रपटाचेही आपण प्रकार पाडतो. विशिष्ट प्रकारच्या चित्रपटाला आपण अनुबोधपट म्हणतो, दुसऱ्याला फीचर फिल्म म्हणतो, तिसऱ्याला कार्टून फिल्म म्हणतो, चौथ्याला नाटकाची केलेली फिल्म असं म्हणतो. असे अनेक. हे प्रकार पाडल्यानंतर मग त्या त्या प्रकारात संगीत काय करतं ते बघावं लागेल. पण मी असं म्हणेन की चित्रपट म्हणून जो एक कल्प, जी एक

बांधणी उभी केली जात असते, तिला समांतर ताकदीनं जाणारा दुसरा सांगीतिक कल्प किंवा बंध जेव्हा होतो, तेव्हा ते योग्य चित्रपटसंगीत झालं, असं म्हणावं लागेल.

***आतापर्यंत आपल्याकडं जे काही चित्रपटसंगीत निर्माण झालं आहे त्याचा संदर्भ घेऊन त्यात बरं-सरस-वाईट, योग्य-अयोग्य असं उदाहरणांसह सांगितलं तर आपला मुद्दा अधिक स्पष्ट होईल***.

फार इतिहासात गेलो नाही तरी चालेल. कारण चित्रपटांचा इतिहास तसा थोड्याच वर्षांचा आहे. तीस सालापासूनचा. त्यातही असं झालं आहे की कालमानाप्रमाणे चित्रपटामागच्या प्रेरणा बदलत गेल्या आहेत, व त्याप्रमाणे चित्रपटसंगीताच्याही प्रेरणा बदलत गेल्या आहेत. आणि खरं पाहता, चित्रपट ही 'तरुण कला' आहे; आणि त्या कलेचे पूर्ण विभ्रम आपल्या नजरेस अजून पडलेले नाहीत. ती अजून विकसित होणारी गोष्ट आहे.

हे ध्यानात घेऊनसुद्धा असं म्हणता येईल - पहिल्याने म्हणजे सुरुवातीपासून मूकपटामध्ये जेव्हा संगीतआलं तेव्हा त्या संगीताच्या प्रेरणा वेगळ्या होत्या. त्याला ध्वनीच्या पातळीवर जास्त वावरायला लागत होतं. ध्वनीच्या पातळीवर वावरत असतानाही पोषक आणि पूरक वातावरणनिर्मिती इत्यादी निकष लागत होते. मूकपटांची प्रेरणा वेगळी म्हणून मूकपटांच्या संगीताचीही प्रेरणा वेगळी. तिथं त्या संगीताने त्याचं कार्य साधलं की नाही हा निकष लावला तर तेव्हा ते नक्कीच साधलंअसावं. ते लोक केवळ प्रोजेक्टरचा आवाज लपविण्यासाठी म्हणून संगीत वापरत होते, ही एक अत्यंत चुकीची कल्पना आहे. कारण प्रोजेक्टरचा आवाज लपविण्यासाठी जर ते संगीत असतं तर कुठल्याही संगीतानं तो आवाज ते लपवू शकले असते किंवा प्रोजेक्टरचा आवाज दडपून टाकण्याचा शोध लावण्यामागे लोक लागले असते. तसं न करता चित्रपटाला संगीताची जोड दिल्याने चित्रपटात काहीतरी भर पडते असं त्यांना वाटत असल्यामुळे ते संगीताचा उपयोग करून घेत होते. तेव्हा तो काही असा बाहेरून आलेला एखादा भाग नव्हता, तर तो अंगभूत अनुभवाचाच भाग होता. आणि तसं पाहता दृश्यानुभव आणि श्राव्यानुभव हे पूर्णतः वेगवेगळे केले तर ते दोन्ही स्वतःच्या ताकदीने पूर्णपणे उभे राहू शकत नाहीत अशीच जाणीव व्हायला लागते आणि म्हणून ते दोन्ही एकत्र येणं आवश्यक होतं आणि म्हणून ध्वनिपरिणामांच्या पातळीवर का होईना, तेव्हा जे वावरत होतं ते संगीत होतं आणि आपलं कार्य साधत होतं.

यापुढची आणखी एक प्रेरणा नाटकाच्या संदर्भातली. जे नाटक आपल्या इथं होत होतं, रुजलं होतं, यशस्वी झालं होतं, त्या यशस्वी नाटकाला नवीन माध्यमामध्ये आणून बसवायचं. जसंच्या तसं. त्यामुळे मग तिकडे जेवढी गाणी, तेवढीच इकडेही गाणी; पण त्याच्या जोडीला नाच आहे, सिनसिनरी आहे; इत्यादी गोष्टी आल्या. त्यामुळे अशा प्रकारच्या संगीताचं त्याचं असं कार्य साधलं जात होतं. परंतु हे संगीत चित्रपटसंगीत व्हायला तयार नव्हतं. कारण चित्रपट म्हणजे काय याचीच कल्पना विकसित होत होती. मूकपटामधून चित्रपटांनी ध्वनीच्या क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर त्या ध्वनीचं नावीन्य हाच भाग महत्त्वाचा वाटत होता. त्या वेळी चित्रपटांनी स्वतःचा आकार धरला होता असं आपण म्हणू शकत नाही. जेव्हा आपण केवळ नावीन्याच्या आहारी गेलेलो असतो, तेव्हा त्याला निकष लावणं चुकीचं असतं. कारण त्या नावीन्याच्या पोटीच या गोष्टी घडलेल्या असतात. तो एक कौतुकाचा भाग म्हणून बाजूला ठेवला पाहिजे. कौतकालाही एक जागा असते, आणि तेवढी ती आपणमान्य केली पाहिजे.

पण त्यानंतर जेव्हा फाळक्यांचा चित्रपट निघाला की जो पहिला खऱ्या अर्थाने चित्रपट म्हणून तयार केला गेला होता, त्यात चित्रपटाची म्हणून जी काही ताकदीची स्थानं होती ती जाणीवपूर्वक वापरण्याचा प्रयत्न केला गेला होता. माझ्या स्मरणात आहे की अगदी नंतर फाळक्यांनी मद्रासला एक भाषण केलं होतं आणि तेव्हा फाळके असं म्हणाले होते की चित्रपटाची खरी ताकद काय आहे हे विसरून आपण अजून 'बोलभांड' चित्रपट तयार करत आहोत. म्हणजेच फाळकेंना नाटकाचा वारसा खटकायला लागला होता, आणि ते

दृश्यानुभवावर आणि त्याच्या जोडीला जे काही येऊ शकतं त्यावर भर द्यायला लागले होते. म्हणजेच चित्रपटाची पहिली जाणीव निर्माण होऊ लागली होती असं आपण म्हणू शकू.

आता या प्रकारच्या चित्रपटाला संगीत देण्याची आवश्यकता का भासली असा प्रश्न मी उपस्थित करतो. म्हणजे तिथंही प्रेरणा बदलली असंच म्हणावं लागेल. पहिल्यांदा जेव्हा म्हटलं की दृश्यानुभवाला ध्वनीची जोड द्यावी लागते म्हणून चित्रपटात संगीत येणं ही गोष्ट एक समग्र अनुभव देण्यासाठी म्हणून ठीक झाली. पण यापलिकडचंही अधिक सूक्ष्म समीकरण फाळक्यांचं होतं.

त्यांना असं वाटायला लागलं होतं की माझा चित्रपट हा भारतभर पोचवायचा आहे. नाटकाचा जो प्रेक्षकगण होता तो एका अर्थानं प्रांतिक होता. कारण तो भाषेशी निगडित होता. मराठी नाटकप्रांतिक होतं. कारण ते मराठी भाषेशी निगडित होतं. त्याला जेव्हा जेव्हा आपल्या परिघाबाहेर जावंसं वाटलं तेव्हा तेव्हा त्यानं संगीताचा आश्रय घेतला. कारण संगीत हे संपूर्ण भारतभर पसरलेलं आणि मराठी भाषा ही एका प्रांतापुरती. तरी परभाषिक नाट्यसंगीताचा आस्वाद घेत होते, याचं कारण त्यांची सांगीतिक पार्श्वभूमी एकच होती. तो वारसा एक होता.

नेमकं हेच सूत्र फाळक्यांनी पकडलं असं दिसतं. या प्रेरणेमधून त्यांनी संपूर्ण भारतात पोचण्यासाठी दोन गोष्टी अशा निवडल्या की ज्यांचं आवाहन अखिल भारताला होतं. एक म्हणजे मायथॉलॉजी व दुसरं म्हणजे संगीत. आणि मजेचा भाग असा आहे की पुढं कलकत्ता आणि मुंबईमध्ये चित्रनिर्मितीची जी दोन केंद्रं तयार झाली, त्या दोहोंनीही हीच साधनं वापरली. प्रांतिक मर्यादांच्या बाहेर जाण्यासाठी आणि चित्रपट या माध्यमाला-म्हणजे कथेमधून किंवा पौराणिक गोष्टींमधून जे काही साधायचं आहे त्याला-त्याच ताकदीची दुसरी जोड देण्यासाठी दुसरी काय गोष्ट आहे, तर संगीतच आहे. आणि म्हणून या दोन गोष्टी, मिथ आणि म्युझिक, एकत्र येणं ही अत्यंत अंगभूत गोष्ट होती. आणि इथंही मला असं वाटतं की चित्रपटाची प्रेरणा बदलली व त्यामुळे चित्रपटसंगीताचीही प्रेरणा बदलू लागली. त्या वेळी फाळक्यांनी गाणी वगैरे किती वापरली असा प्रश्न विचारण्यात काही अर्थ नाही. कारण संगीत म्हणजे काही केवळ गाणीच नव्हेत. आपल्याकडच्या नाटकांमध्ये दुर्दैवाने तशी व्याख्या झाली. गाणं हा संगीताचा एक भाग. तेव्हा चित्रपटसंगीतात संगीताचे इतरही भाग यायला हवेत, आणि ते यायलाही लागले.

यानंतरच चित्रपटांच्या आणि त्याबरोबर चित्रपटसंगीताच्या प्रेरणा बदलल्यामुळे चित्रपटसंगीतात बदल घडून आले ते सामाजिक जाणिवेचे चित्रपट यायला सुरुवात झाली तेव्हा. संगीत हे जास्त नेमकेपणानं वापरलं जाऊ लागलं. म्हणजे केवळ गाणारा माणूस आहे म्हणून चित्रपटात गाणं येणं असं न होता, ते कारकुनाचं भाषण असेल तर, तरीही त्यामागे पार्श्वसंगीत येऊ शकतं, अशा प्रकारची जाणीव निर्माण झाली. यामुळे चित्रपटाची-चित्रपटसंगीताची एक वेगळी परिभाषा असतेआणि त्याचं परिमाणही वेगळं असतं हे समजू लागलं होतं. कुठेतरी नैसर्गिकता किंवा वास्तववाद यांच्या आहारी जाऊन प्रत्येक वेळेला गाणारं पात्र घ्या म्हणजे ते गाईल, किंवा, कोठलंही पात्र गायलं तरी तिकडे लक्ष द्यायचं नाही-विसंगत आहे हे विसरायचं, यापैकी कशाचाही आधार घ्यायला न लागता, संगीत वेगळ्या पातळीवर चित्रपटाच्या एकंदर अनुभवाला वेगळं परिणाम देऊ पाहात असतं, याची जाणीव झाल्यामुळेपार्श्वसंगीत आणि पार्श्वध्वनी यांचा चांगला विचार होऊ लागला.

आतापर्यंतच्या दोन्ही अवस्थांमध्ये निर्मात्यापेक्षा दिग्दर्शकाचा अधिक ठसा चित्रपटावर असे. त्यांना दिग्दर्शकाचे चित्रपट म्हणायला हवं. १९५० च्या आगेमागे ज्याला निर्मात्याचा म्हणता येईल असा चित्रपट समोर आला. इथंही चित्रपटाची प्रेरणा बदलली आणि त्याबरोबरच चित्रपटसंगीताचीही प्रेरणा बदलली. एक मजेची गोष्ट आठवते. तारखा जर बरोबर असतील, तर १९४७ मध्ये मद्रासमध्ये 'चंद्रलेखा' हा चित्रपट निघाला आणि 'कल्पना' हा चित्रपटही तेथेच त्याच वर्षी निघाला. आता 'कल्पना' उदयशंकरने केलेला व

त्यामध्ये संपूर्णतः नृत्यकलेला चित्रपटाच्या माध्यमात अत्यंत जाणीवपूर्वक काहीतरी वेगळं करायला लावलं होतं आणि त्याच वेळी निर्माण झालेला 'चंद्रलेखा' पेजंट्री' आणि 'चमत्कारां'च्या पातळीवर गेलेला आहे.

हे दोन्ही चित्रपट एकाच वेळी तयार होतात ही गोष्ट महत्त्वाची आहे. मला असं म्हणायचं आहे की त्या सुमारास दिग्दर्शकाचा चित्रपट थांबला आणि निर्मात्याचा चित्रपट सुरू झाला. निर्माता असं म्हणत असतो की मला चित्रपटाचा व्यवसाय करायचाय, तेव्हा प्रत्येक क्षेत्रातले जेवढे जेवढे चांगले नग आहेत तेवढे माझ्या चित्रपटात यायला पाहिजेत. आणि म्हणून मग तेव्हा म्युझिक डायरेक्टर निर्माण झाला. तेव्हापासून मग म्युझिक डायरेक्टर वेगळा-म्हणजे तो चित्रपटाच्या एकंदर निर्मितीमध्ये सुरुवातीपासून शेवटपर्यंत सामावलेला असतोच असं नाही-चित्रपटात आला. सरळ सरळ त्याला सांगितलं जातं की 'आठ गाणी पाहिजेत, हे गायक आहेत, इ. इ.' तुमचं जे काही सुंदर असेल ते आणून टाका, इकडे बाकीच्यांनी आणलेल्या ज्या काही सुंदर गोष्टी आहेत त्या सर्व एकत्र करून आम्ही त्याचा मसाला करून वापरू, असा प्रकार सुरू झाला. या तऱ्हेचा एक व्यावसायिक दृष्टिकोन रुजू झाला. 'व्यावसायिक' या शब्दातून मला हीनता दाखवायची नाही, तर त्यामध्ये विचाराचं जे वेगळं अंग आहे, ते सुचवायचं आहे.

आणि म्हणूनच प्रत्येक गाणं सुंदर करायचा अट्टाहास सुरू झाला. कारण प्रत्येक गाणं हा वेगळा भागच आहे, ते वेगळं उभंच राहतंय मुळी. त्यामुळे माझं गाणं लोकांच्या लक्षात रहायलाच हवं असा आग्रह सुरू झाला. मग त्यासाठी चांगले गायक पाहिजेत-उदाहरणार्थ,लता मंगेशकरच पाहिजे-दुसऱ्या कुणाचा आवाज चालणार नाही, असा आग्रह त्यातून आला. प्रत्येक गाणं वेगळा प्रॉडक्ट आहे व त्याला त्याचं म्हणून स्वतःचं क्लायंट आहे, असा समज दृढ झाला. म्युझिक डायरेक्टरही म्हणू लागला की माझे म्हणून काही श्रोते आहेत, तेव्हा त्यांच्या अपेक्षा मला पूर्ण करायलाच हव्यात.

अशा प्रकारच्या तीन वेगवेगळ्या प्रेरणांमधून चित्रपटसंगीत आलं आहे. आणि त्यामुळेच चित्रपटसंगीत म्हणजे नेमकं काय व कोणतं योग्य हे ठामपणे ठरवता येणं कठीण आहे.

***चित्रपटसंगीताचा इतक्या जलदगतीनं प्रसार झाला, यामागे काय कारण असावं?***

चित्रपटसंगीताचा जलदगतीनं प्रसार झाला ही त्या माध्यमाचीच ताकद आहे. जनतासंपर्क माध्यमांची अंगभूत व्याख्याच अशी आहे की असंख्य लोकांपर्यंत भाषा-प्रांत इत्यादी भेद ओलांडून जे पोचू शकतं तेच खरं जनतासंपर्क माध्यम. चित्रपटात ही ताकद आहेच. त्यामुळे चित्रपटसंगीताच्या प्रसारासाठी काही फार वेगळं करायला लागलं नाही. चित्रपटाचा प्रसार हेच त्याचं कारण.

जेव्हा बोलका चित्रपट निघाला तेव्हाच नभोवाणीही आकाराला येत होती. चित्रपटसंगीताचा प्रसार नभोवाणीद्वारे व्हायला उशीर लागला, ते नंतर यायला लागलं, हे खरं; पण एकंदरीने लोकांचे ऐकायचे साचेच मुळी बदलायला सुरुवात झाली होती. नाटकांप्रमाणे चित्रपटांचीही गाणी चित्रपटांतून वेगळी काढून ऐकण्याची तयारी व इच्छा निर्माण झाली, याचं कारण जनतासंपर्क माध्यमच होतं. २१ सालापासून नाटकाच्या ध्वनिमुद्रिका निघायला सुरुवात झाली होती. अतिशय कमी किंमतीची जपानी फोनोग्राफ यंत्रं बाजारात यायला १९१५ च्या सुमारास सुरुवात झाली होती. त्यामुळे घरोघरी संदर्भापासून व चौकटीपासून वेगळं काढलेलं संगीत ऐकणं हा सवयीचाच भाग झाला होता. यातच चित्रपटातील गाण्यांचा समावेश होता. त्याचा प्रसार होणं हे गृहीतच धरायला हवं.

***कीर्तन, नाटक अशी परंपरा असल्याने चित्रपटात संगीत आलं असं मानलं, तर पाश्चात्त्य देशातही अशी परंपरा आहे. परंतु त्यांच्या चित्रपटात केवळ पार्श्वसंगीतच असतं. आपल्याकडच्या चित्रपटांत (कंठ) संगीत हा अविभाज्य घटक का झाला?***

केवळ कीर्तन, नाटकाकडे जाऊन फारसं साधणार नाही. कारण मघाशी मी म्हटल्याप्रमाणं मिथ आणि म्युझिक यांनी एकत्र येणं महत्त्वाचं होतं. दुसरं म्हणजे भारतीय परंपरांमध्ये नेहमीच संगीताला महत्त्वाचं स्थान असतं. आपल्या संगीतपरंपरेमध्ये 'गीत' श्रेष्ठ मानलं गेलं आहे. तसंच ज्याला आपण 'एकलं गाणं' म्हणतो-सोलो-त्यालाही महत्त्व आहे. या दोन्हींचा अनिवार्य परिणाम म्हणूनच गाणीच येणं आवश्यक होतं. म्हणूनच ती आली. म्हणजेच आपण एवढं म्हणू शकतो की एकंदरच भारतीय परंपरेमधील गाण्याची प्रेरणाच इथं कार्यरत झाली होती.

***प्रादेशिक चित्रपटातील संगीत पाश्चात्त्य संगीताच्या प्रभावापासून काहीसे अलिप्त राहिले. हे कशामुळे घडलं?***

प्रादेशिक चित्रपट म्हणजे नेमकं काय हा प्रश्नच आहे. पण तो आपण समजून घेऊ या. विशिष्ट भूमीशी, भाषेशी, संस्कृतीशी निगडित असलेले चित्रपट म्हणजे प्रादेशिक चित्रपट. त्यात वास्तववादाचा भाग अधिक म्हणून प्रादेशिक संगीत येणं अपरिहार्य ठरतं. ही साहित्यिक भूमिका आहे. चित्रपटीय नव्हे. दरवेळी हा प्रकार झाल्याने चित्रपटाच्या आशयघनतेत काही वाढ होत होती असंही नव्हे. वास्तववादाची ठोकळ भूमिका समोर असल्यानं इतर सर्व वास्तववादी गोष्टींबरोबर वास्तववादी प्रादेशिक संगीतही आलं आणि या भूमिकेमुळे प्रादेशिक चित्रपट पाश्चात्त्य संगीतापासून अलिप्त राहिलं.

***एका बाजूला सध्याचे हिंदी लोकप्रिय संगीत पाश्चात्त्य आक्रमणाखाली आहे. ग्रामीण प्रेक्षक एकीकडे आपापलं प्रादेशिक संगीत सांभाळतो आणि दुसरीकडे हिंदी चित्रसंगीतही डोक्यावर घेतो. असं का होत असावं?***

या दोन्ही गोष्टी वेगवेगळया आहेत. माणूस एखाद्या प्रदेशातला असतो आणि त्याच वेळेला तो एका मोठ्या प्रदेशातला घटक म्हणूनही वावरत असतो. समजा, मी मराठी भाषिक आहे, त्याचबरोबर मी एका महानगराचा नागरिकही आहे. मराठी माणूस म्हणून मी काही गोष्टी जपेन, त्याचबरोबर महानगराचा नागरिक म्हणूनही मी काही गोष्टी घेईन. या काही परस्परविरोधी भूमिका नाहीत. उलट त्या अधिकाधिक सर्वसमावेशक असतात. आजचा शेतकरीदेखील, रेडिओ, दूरदर्शन, चित्रपट अशा संपर्कमाध्यमांच्या संपर्कात आला आहे. त्यामुळे दोन्ही प्रकारच्या संगीताने त्याच्यावर प्रभाव पाडणं यात अनैसर्गिक असं काही नाही.

***याच प्रश्नाच्या संदर्भात चित्रपटसंगीत आणि लोकसंगीत यांच्या संबंधाचा विचार करायला हवा.***

नाही. तसा फारसा विचार करता येईल असं पण मला वाटत नाही. चित्रपटात जे लोकसंगीत शिरलं आहे ते प्रादेशिक म्हणून. होनाजी बाळासारखी कॅरॅक्टर होती म्हणून 'अमर भूपाळी'त लावणीचा वापर झाला किंवा खेड्यातील वातावरणनिर्मितीसाठी लोकसंगीताचा उपयोग होतो. हे उपयोजक संगीत आहे. चित्रपटाच्या चौकटीत त्याला स्वतःचं असं वेगळं स्थान नाही.

***मला असं म्हणायचंय की लोकसंगीत ज्या प्रकारे लोकांकडून जपलं जातं, ऐकलं जातं, गायलं जातं, तोच प्रकार काहीसाचित्रपटसंगीताच्याही बाबतीत होत नाही का?***

नाही. लोक कुठल्या प्रकारे या दोन गोष्टींचं ग्रहण करतात त्या मनोभूमिकांत फरक असणं शक्य आहे. चित्रपटात येणारं लोकसंगीत व बाहेर तुम्ही ऐकता ते लोकसंगीत यांच्या चौकटीच अगदी वेगवेगळया असतात. दोन वेगवेगळया प्रयोजनांसाठी असतात. तेव्हा या दोहोंची गल्लत करू नये. देवळातलं भजन आणि चित्रपटातलं त्याचं दृश्य या दोन वेगवेगळया गोष्टी असतात.

***चित्रपटसंगीतात अधिकांशाने 'हाय पीच' वापरण्याचे कारण काय?***

इथं बऱ्याच गोष्टी विचारात घ्यायला हव्यात. ध्वनिमुद्रणाची तंत्रं बदलत गेली. अतिशय उच्चस्वरी आवाज ध्वनिमुद्रण करताना अधिक चमकदार व आकर्षक वाटतात. त्यामुळे ते 'हाय पीच' वापरले जातात.

प्रारंभी चित्रपटात गाणारे लोक ढाल्या सुराचे होते. उदा. के. एल. सैगल, पंकज मलिक, नूरजहाँ, शमशाद बेगम इ. १९४७ नंतर 'हाय पीच'ची सुरुवात झाली. १९४७ नंतर 'निर्मात्याचा' चित्रपट जो प्रत्येक क्षेत्रात 'आकर्षक' होण्याचा प्रयत्न करतो, तो प्रचारात आला हे अगोदर सांगितलंच आहे. त्यातली गाणी अधिकाधिक आकर्षक करण्यासाठी 'हाय पीच' वापरले जाऊ लागले. याच काळात लता मंगेशकर चित्रपटगीत-गायनात यशस्वी ठरल्या. यश मिळालं त्यापलिकडे न जाणं हा चित्रपटव्यवसायातील व्यावसायिकतेचा एक गुणधर्म असल्यानं लता मंगेशकरांची अनुकरणं होत राहिली व 'हाय पीच'चा प्रभाव तसाच राहिला.

***हिंदी चित्रपटसंगीताच्या अमाप लोकप्रियतेचं कारण त्यात उपयोगात आणलेलं शास्त्रीय संगीत, लोकसंगीत इ. की अन्य काही?***

संगीताच्या लोकप्रियतेचे कारण चित्रपटांची लोकप्रियता, अन्य काहीनाही.

***गीतांचं साहित्यमूल्य समजून चाल बांधणारे संगीतकार कोणते? आधी चाल तयार असताना त्यावर बांधलेल्या गीताला साहित्यमूल्य येतं का?***

गीताचे साहित्यमूल्य समजून चाल बांधणारे संगीतकार कोणते, हे सांगणं थोडं अवघड आहे.

एखाद्या संगीतकाराला साहित्यातलं तसं काही कळत नसूनही शब्दांचा 'फील'असू शकतो व त्याआधारे तो शब्दांना न्याय देऊ शकतो. अगोदर बांधलेल्या चालीवर गीत चांगले होते की नाही हे त्या संबंधित कवीवर अवलंबून असतं. पण असं गीत चांगलं होऊच शकत नाही असं मात्र नाही. कवीला असलेल्या संगीतभानाचाही प्रश्न त्याच्याशी निगडित असतो.

***शास्त्रीय संगीतकारांना चित्रपटसंगीत इतकं दूरचं का वाटतं?***

मुळीच दूरचं वाटत नाही. सगळे शास्त्रीय संगीतकार आवडीनं व अनेकदा मत्सरानं चित्रपटातील संगीत ऐकत असतात. आपण आयुष्यभर मेहनत करून आपल्याला जे जमत नाही, ते ही मंडळी इतक्या सहजगतीनं करतात याबद्दल शास्त्रीय संगीतकारांना थोडंसं कौतुक, थोडासा मत्सर वाटत असतो.

***शास्त्रीय संगीत चित्रपटातून विस्तृत प्रमाणावर लोकप्रिय झालं असं वाटतं का? झालं असेल तर शास्त्रीय संगीताच्या अभिजाततेपासून श्रोता दूरच राहिला, असं वाटतं का?***

शास्त्रीय संगीत चित्रपटांमधून लोकप्रिय ठरलं तरी ते 'चित्रपटसंगीत' म्हणून लोकप्रिय ठरलं, शास्त्रीय संगीत म्हणून नव्हे. नाट्यसंगीताचा जसा मैफिलीत समावेश झाला तसा चित्रपटसंगीताचा झाला नाही. चित्रपटात शास्त्रीय संगीताच्या ज्या छटा आल्या त्या शास्त्रीय

संगीताचा तोंडवळा स्पष्ट करणाऱ्या होत्या. ते 'शास्त्रीय संगीत' नव्हतं. त्यामुळे शास्त्रीय संगीताच्या अभिजाततेची अपेक्षा त्याच्याकडून करणं चुकीचं आहे.

***'झन झन झन पायल बाजे', 'मोहे पनघटपे नंदलाल'- अशा मूळ बंदिशी चित्रपटात भ्रष्ट स्वरूपात येतात. असं असेल, तर शास्त्रीय संगीतातलं सुलभीकरण म्हणजे मूळ बंदिशीची भ्रष्ट रूपंच नव्हेत काय?***
***(शब्दांना न्याय न देता, स्वराची आसन सांभाळता आणि बंदिशीच्या फॉर्मला न जुमानता गायलेलं संगीत.)***

'झन झन झन' मी ऐकलं आहे. ते खरंच भ्रष्ट स्वरूपात आलं आहे. भ्रष्ट म्हणजे मूळ चिजेचा तोंडवळा तर दिसतो पण त्यात केलेल्या बदलाने काही साधलं गेलं नाही. काहीच ताकद नसलेली एक संदिग्धता निर्माण झाली आहे. ही संदिग्धता समर्थ नाही म्हणून तिला भ्रष्ट म्हणायचं. शुद्धतेचा आव यात नाही. 'पनघटपे'च्या संदर्भात मात्र असं घडलं आहे असं मला वाटत नाही. शुद्धतेचा उगाचच अट्टाहास धरण्यात अर्थ नाही. 'पनघट पे' थोडं हलकं जरूर झालं असेल, पण त्यामुळे त्याला भ्रष्ट म्हणता येणार नाही.

प्रश्नातील 'सुलभीकरण' म्हणजे काय हे नीट समजत नाही. पण काही बंदिशी वेगवेगळ्या पातळ्यांवर वावरू शकतात. त्या जर तशा वावरल्या तर त्यांना मी भ्रष्ट म्हणणार नाही.

***पाश्चात्त्य पद्धतीचा वाद्यमेळ आणि भारतीय पद्धतीच्या चाली असे मिश्रण होण्याचे कारण काय?***

परिणामकारकता हवी म्हणून. तंत्राचा भाग म्हणून.

***आता असतो तेवढ्या मोठ्या प्रमाणात वाद्यमेळाची जरुरी आहे का? गीताच्या परिणामाशी त्याचा संबंध आहे का?***

या बाबतीत सर्वसाधारण विधान करणं कठीण आहे. वाद्यमेळाचा गीताच्या प्रकृतीशी संबंध असतो. ओवी असेल तर मोठा वाद्यमेळ तिथे साजणार नाही. समूहगान असेल तर मोठा वाद्यमेळ लागेल. अर्थातच फॅशन म्हणूनही काही भाग येतोच.

***भारतीय चित्रपटांमधील (सर्व भाषांमधील) पार्श्वसंगीताचा दर्जा काय?***

हा दर्जा सुधारतोय असं मला वाटतं. पाश्चात्त्य हार्मनायझेशनचा अत्यंत चतुर असा उपयोग केला जातो आहे. कधी कधी नक्कलही होतेच. पण ती स्वीकारायला हवी. चित्रपट ही एक तरुण कला आहे हे लक्षात घेऊन, बरंच काही घडतं आहे, घडायचं आहे हे समजावून घेऊन आपण थोडी वाट पाहायला हवी.